लोकसत्ता

Date: 10 February 2010; Page:05; Edition: Nagpur

# युएफओ मोठ्या पडद्यावर आयपीएल सामने दाखवणार

**नागपूर, ९ फेब्रुवारी/प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठे सॅटेलाईट नेटवर्क असलेल्या युएफओ मुव्हीजने क्रिकेट सामने पाहण्यासाठी व त्याचा आनंद लुटण्याकरीता एक नवीन व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. क्रिकेट मनोरंजनामध्ये वाढ करण्यासाठी युएफओ आता मल्टीप्लेक्स आणि साध्या चित्रपटगृहात डीएलएफ आयपीएल क्रिकेट सामने मोठ्या पडद्यावर हाय डेफिनिशन फॉर्मेटमध्ये कोणत्याही जाहिरातीशिवाय लाईव्ह दाखविणार आहे. युएफओच्या माध्यमातून सामना पाहणाऱ्या प्रेक्षकांसाठी चित्रपटगृहात स्टेडियमसारखाच आनंद देण्याची योजना आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती या सिनेमागृहात, नियमितपणे टीम्सला प्रोत्साहन देण्यासाठी भेट देतील. यासाठी युएफओने सिनेमॅक्स, आयनॉक्स, फेम, पीव्हीआर आणि इतरांबरोबर आणि एकच पडदा असणाऱ्या थिएटर्सशी भागीदारी केली आहे. यामुळे १२ मार्च पासून डिएलएफ टी २० सामने पडद्यावर पाहणे शक्य होणार आहे. यात देशभरातील ५०० एक पडदा असलेले चित्रपटगृह आणि २०० हून अधिक मल्टीप्लेक्सचा समावेश आहे. ■

व्यापार